. शिवाजी महाराज जयंती

- १९ फेब्रुवारी २०२१
- उद्दिष्टे –शिवाजी महाराजांच्या कार्याप्रती आदरांजली वाहणे व त्यांचे कार्य समजून घेणे.
- संक्षिप्त सारांश

महाविद्यालयात प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांच्या अध्यक्षतेखाली छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९१ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ आरमोरीचे सचिव मा. श्री. मनोजभाऊ वनमाळी हे होते. याशिवाय गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीचे प्र–कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक मा. तुळशिरामजी भोयर पिसेवडधा, उपप्राचार्य डॉ. चंदकांत डोर्लीकर, प्रमुख वक्ते प्रा. डॉ. विजय रैवतकर, प्रा. नोमेश मेश्राम उपस्थित होते.प्रमुख वक्ते प्रा. डॉ. विजय रैवतकर यांनी शिवाजी महाराजांच्या कर्तृत्व गुणांचा परिचय करून देताना शिवाजी महाराजांना केवळ गोब्राम्हण प्रतिपालक आणि अफजलखानाचा वध करणारा म्हणून शालेय जीवनात प्रसारीत केले जाते. मात्र शिवाजी महाराजांची लढाई ही धर्माची लढाई नसून रयतेला सुखी व समृद्ध जीवन प्रदान करण्याची होती ते केवळ गोब्राम्हण प्रतिपालक असते तर. अंगावर चालून येणाऱ्या कृष्णाजी भास्कर कुलकर्णी याला त्यांनी लोळवले नसते! स्त्रियांना आणि शेतकऱ्यांना सन्मानजनक जीवन प्रदान करण्यासाठी शेतकऱ्यांच्या पिकांना हाथ लावू नका, परराज्यातील स्त्रीयांची विटंबना करू नका असा आदेश त्यांनी आपल्या सैन्याला दिला नसता. जनतेवर दुष्काळी संकट ओढावले तेव्हा स्वत:चा खजिना रयतेसाठी खुला करून देणारे शिवाजी महाराज हे भारतातील एकमेव राजे आहेत. आज परकीय कंपन्यांनी भारतात यावे आणि व्यापार करावा म्हणून आपण त्यांच्यावर करमाफी करतो. परंतु डचांच्या व्यापारावर अडीच टक्के जकात लावून रयतेचे हित जोपासणारा छत्रपती शिवाजी महाराज धर्मनिरपेक्ष राजा आहे. असे प्रतिपादन डॉ. विजय रैवतकर यांनी केले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा यांनीसुद्धा शिवाजी महाराज यांच्या जयंतिनिमित्त आपल्या मनोगतातून संस्थेचे कार्य हे छत्रपती शिवाजी महाराज, राष्ट्रपिता महात्मा गांधी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संस्थापक स्व. वामनरावजी वनमाळी, माजी संस्थाध्यक्ष स्व. किशोरभाऊ वनमाळी यांच्या विचारावर चालत राहील, असे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. शशिकांत गेडाम, प्रा. गजेंद्र कढव यांनी केले. संचालन व आभार प्रा. सीमा नागदेवे यांनी मानले. तंत्रसहाय प्रा. डॉ. सतीश कोला, प्रा. सुनिल चुटे, प्रशांत दडमल यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. अमिता बन्नोरे, प्रा. डॉ. जयेश पापडकर, प्रा. डॉ. रमेश ठोंबरे, प्रा. डॉ. राजेंद्र चव्हाण, प्रा. शशिकांत गेडाम, प्रा. डॉ. विजय गोरडे, प्रा. डॉ. मनोज ठवरे, प्रा. डॉ. सी.डी. मुंगमोडे, प्रा. दिलीप घोनमोडे, प्रा. डॉ. वसंता कहालकर, प्रा. सतेंद्र सोनटक्के, प्रा. ज्ञानेश्वर ठाकरे, प्रा. गजेंद्र कढव, प्रा. गजानन बोरकर, प्रा. स्नेहा मोहुर्ले, प्रा. सुनंदा कुमरे, प्रा. डॉ. किशोर वासुर्के, किशोर कुथे, सचिन ठाकरे, प्रशांत गणवीर, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

**सहभागींची संख्या –६१**

**निष्पत्ती –छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवनकार्य समजून घेता आले. आजच्या वर्तमानात शिवाजींच्या कार्याची महती लक्षात आली.**







**Shiwaji Jayanti**

लोकशाही वार्ता दि. 22/02/2021

# शिवाजी महाराजांचे चरित्र विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी

## मनोज वनमाळी यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी/ आरमोरी

१७ व्या शतकात मोगली सत्तेत भारतात अनेक राजे आपापल्या जहांगिरी सांभाळून आनंदात असताना शिवाजी महाराजांनी आपल्या अल्पशा मावळ्यांच्या व्यक्तीबळावर स्वतःचे राज्य उभारले आणि त्याचा विस्तार करून शिवाजी महाराजांनी ज्या गनिमी मार्गाचा अवलंब करून आपले राज्य निर्माण केले, त्यांचा हा स्वावलंबी बनण्याचा आणि स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्याचा मार्ग विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात निर्माण केला पाहिजे, असे प्रतिपादन मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव मनोज वनमाळी यांनी केले.

महात्मा गांधी महाविद्यालयात येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९१ वी जयंती साजरी करण्यात आली यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. कार्यक्रमास गोंडवाना विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक तुळशिराम भोयर (पिसेवडधा), उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत डोर्लीकर, प्रमुख वक्ते प्रा. डॉ. विजय रैवतकर, प्रा. नोमेश मेश्राम उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. रैवतकर यांनी शिवाजी महाराजांच्या कर्तृत्व गुणांचा परिचय करून देताना म्हणाले, शिवाजी महाराजांना केवळ गोब्रम्हाण प्रतिपालक आणि अफजलखान वध करणारा म्हणून शालेय जीवनात प्रसारीत केले जाते. मात्र शिवाजी महाराजांची लढाई ही धर्माची लढाई नसून रयतेला सुखी व समृद्ध जीवन प्रदान करण्याची होती. ते केवळ गोब्राम्हण प्रतिपालक असते तर अंगावर चालून येणाऱ्या कृष्णाजी भाष्कर कुलकर्णी याला त्यांनी लोळवले नसते! स्त्रियांना आणि शेतकऱ्यांना सन्मानजनक जीवन प्रदान करण्यासाठी शेतकऱ्यांच्या पिकांना हाथ लावू नका, परराज्यातील स्त्रीयांची विटंबना करू नका असा आदेश त्यांनी आपल्या सैन्याला दिला नसता. जनतेवर दुष्काळी संकट ओढवले तेव्हा स्वतःचा खजिना रयतेसाठी खुला करून देणारे शिवाजी महाराज हे भारतातील एकमेव राजे आहेत. आज परकीय कंपन्यांनी भारतात यावे आणि व्यावार करावा म्हणून आपण त्यांच्यावर करमाफी करतो. परंतु डचांच्या व्यापारावर अडीच टक्के जकात लावून रयतेचे हीत जोपासणारा छत्रपती शिवाजी महाराज धर्मनिरपेक्षा राजा आहे, असे ते म्हणाले.

संचालन व आभार प्रा. सीमा नागदेवे यांनी मानले. तंत्रसहाय प्रा. कोला, प्रा. चुटे, दडमल यांनी केले.